# गणपतीचे आध्यात्मिक रहस्य

भारतात व विशेष महाराष्ट्रात मोठ्या संख्येने लोक गणपतीची पूजा, अर्चना व साधना करतात. अन्य लोक ज्यांचे ते इष्ट नाहीत ते सुद्धा शुभ मुहूर्तावर गणपतीच्या स्तुतीने कार्यास आरंभ करतात. कित्येक व्यापारी आपल्या वही खात्याच्या प्रारंभी स्वस्तिकेचे चिन्ह काढतात. स्वस्तिकाला गणेशाचे सूचक व लाभप्रद मानले जाते. प्रत्येक कार्य निर्विघ्न करण्यासाठी गणपतीची उपासना करतात. परंतु अनेकांच्या मनात प्रश्न उठतो की श्रीगणेश विघ्न विनाशक कसे आणि स्वस्तिकेचे रहस्य काय ? याचे रहस्य स्पष्ट करण्यासाठी गणपतीच्या प्रतिकांचा अर्थ जाणणे गरजेचे आहे. परमपिता परमात्मा शिव यांचे जे गुण आहेत ते मूर्तिकारांनी विभिन्न प्रतिकांद्वारे अभिव्यक्त केले आहेत. उदा. ज्ञान सागराकडून प्राप्त सदविवेकास सरस्वतीचे वाहन हंसाच्या रूपाने चित्रित केले आहे. तसेच धन संपदा व वैभव प्राप्त होऊन देखील त्यातील अनासक्त भाव लक्ष्मीला कमलपुष्पाच्या रूपात दाखविले आहे. या परिपाठानुसार गणपतीचे आध्यात्मिक रहस्य समजणे सोपे आहे.

गणपतीस हत्तीचे मस्तक दाखवितात. ते विशाल असते. हत्तीची स्मृती तेज असते. तो आपल्या आसपासचा माहोल ओळखतो. ज्या व्यक्तीस आत्मा, परमात्मा व सृष्टीचक्राचा बोध होतो त्यास संस्कृतमध्ये विशालबुद्धी म्हणतात. तो निश्चयवान व श्रद्धावान असतो. हत्ती जेव्हा गल्लीतून जातो तेव्हा त्यास माकडे घुरतात, कुत्रे भुंकतात तरी पण तो शाहीचालीने चालतो व मस्त राहतो. त्याचप्रमाणे ज्ञानवान व्यक्ती ग्लानीयुक्त व उत्तेजित करणाऱ्या बोल बोलणाऱ्यांकडे ध्यान देत नाही. हत्तीच्या सोंडीचे प्रतीक शिवपुत्र गणपतीला हत्तीची सोंड दाखवितात. हत्तीची सोंड शक्तिशाली असते. वृक्ष उखडून फेकते, लहान मुलांना प्रणाम करते. फूल व पाण्याने पूजा केली जाते.ज्ञानवान व्यक्तीदेखील आपल्या जुनाट सवयी मिटविण्यात समर्थ असतो. दुसऱ्यांना आदर सम्मान व स्नेह देण्यात कुशल असतो.

गजकर्ण - ज्ञानेंद्रिय असलेले कान मोठे असतात. गुरू आपल्या शिष्याला कानातच मंत्र देतात. भगंतांचे गीता ज्ञानदेखील अर्जुनाने कानांनीच ऐकले. ध्यानपूर्वक, जिज्ञासेने ऐकल्याशिवाय मानव विशालबुद्धी बनू शकत नाही. ज्ञान साधनेत श्रवण, मनन व निजिध्ययन मुख्य आहे.

लहान डोळे - या डोळ्यांनी लहान गोष्ट मोठी दिसते. याप्रमाणेच ज्ञानवान व्यक्ती छोट्यामध्ये महानता बघतो. त्यांच्या मनाला आपल्या शब्दांनी तुडवीत नाही.

गजवदन - हत्तीचे मुख लंबे चौडे दाखवितात. जेव्हा एखादा व्यक्ती वाईट कर्मांमुळे पकडला जातो तेव्हा लोक म्हणतात याचे तोंड बघा किती लहान झाले. हत्तीचे तोंड हे चांगल्या कर्मांमुळे निर्भयता आत्मिक शक्तीमुळे समर्थतेचे प्रतिक आहे.

एकदंत - हत्तीचे बाहेर निघालेले दोन दात असतात. ज्ञान व्यक्तीस दुसऱ्या लोकांमुळे थोडेदेखील विघ्न पडू नये हे लक्षात ठेवून चालावे लागते. त्यांनी असे समजू नये की आम्ही विघ्न टाकल्यामुळे हे कोणतेच पाऊल उचलणार नाही. आपले कार्य करण्यास आमच्याकडेदेखील साधन सामर्थ्य आहे. आपल्या बचावासाठी असे रूप दाखवावे लागते. आपल्याकडे दोन दात न सही एकतर आहे. यामुळे लोक उलटे पाऊल उचलणे टाळतात व आपला बचाव होतो. महादोर (मोठे पोट) - जेव्हा एखादा व्यक्ती चांगले वाईट आपल्यात सामावून घेतो तेव्हा लोक म्हणतात याचे पोट मोठे आहे. त्यांना कोणतीही गोष्ट सांगितली तर ते बाहेर सांगत नाहीत.

गणपतीचे चार अलंकार दाखवितात - एका हातात कुऱ्हाड : कुऱ्हाड ही तोडण्याचे साधन आहे. ज्ञानवान व्यक्ती मोह, ममता व जुने संस्कार समाप्त करण्याची क्षमता ठेवून असतो. ज्ञान एका कुऱ्हाडीप्रमाणे उपयोगात आणून मनात जुटलेले दैहिक नाते तोडो. तेव्हाच तो मुक्ती व जीवनमुक्ती प्राप्त करू शकतो. दुसऱ्या हातात बंधन (रस्सी) - दैहिक बंधने मनातून काढल्यानंतर स्वतःला दिव्य नियमांच्या बंधनात बांधायचे. हे शुभ बंधन आहे. वास्तविक पाहता हे बंधन नसून यास संबंध म्हणावे लागेल. आत्म्याचे परमात्म्याशी नाते जुटविणे सुद्धा पवित्र स्नेहात बांधणेच आहे. गणपतीच्या हातातील डोर ही

याच प्रेमाची डोर आहे. एका हातात मोदक - मोदक शब्द लाडू व खुशी देणाऱ्या वस्तूला उच्चारून म्हटले आहे. लाडू बनविण्यासाठी चने पिसणे, भिजविणे अशा क्रिया कराव्या लागतात. ज्ञानवान व्यक्तीलादेखील अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जाऊन तपस्या करावी लागते. मोदक हे ज्ञान निष्ठा व ज्ञान रसाद्वारे प्राप्त शक्तीचे प्रतीक आहे. ज्ञानाद्वारे प्राप्त केलेल्या खुशनुम स्थितीचे प्रतीक आहे. मोदक हे सफलतेचे देखील प्रतीक आहे. जेव्हा एखाद्याचे लक्ष्य सिद्धीस जाते किंवा मनोरथ पूर्ण होतात तेव्हा खूप लाडू वाटतात. खुशी - आनंदाचा उत्सवच साजरा होतो. अशाप्रकारे ज्ञानवान व्यक्ती आपल्या बुद्धी आणि अवस्थेच्या द्वारे कोणतेही कार्य निर्विघ्न पूर्ण करतो. यशापर्यंत पोहोचतो. स्वतः खुश होतो व इतरांना खुश करतो. वरद मुद्रा - गणपतीचा एक हाद वरद मुद्रेत दाखवतात. कारण की जो ज्ञानवान व्यक्ती जो वरील लक्षणे धारण करतो तो दुसऱ्यांना निर्भयता आणि शांतीचे वरदान देण्याचे सामर्थ्य प्राप्त करतो. त्याची स्थिती इतकी महान होते की तो आपल्या शुभ मनोवृत्तीने दुसऱ्यांना आशीर्वाद देऊ शकतो. म्हणून वरद मुद्रेचा हातदेखील ज्ञाननिष्ठ स्थितीच्या पराकाष्ठेचे प्रतीक आहे.

# विघ्नहर्ता श्रीगणेशा

कोणत्याही शुभकार्याच्या शुभारंभास 'श्री गणेशा' केला असे आपण म्हणतो. देवी-देवतांची पूजा करावयाची झाल्यास किंवा कोणतेही मंगल कार्य करावयाचे असल्यास सर्वप्रथम मंगलमूर्ती श्री गणेशाची पूजा केली जाते. त्याशिवाय कोणतेही कार्य सिद्धीस जात नाही अशी सर्वांची श्रद्धायुक्त भावना आहे. सर्व देवगणांचा अधिपति दैवाधिव अर्थाद देवगणांत व दैवीगुणात श्रेष्ठ असलेली देवता गणपती होय. त्यामुळेच असे म्हटले जाते की, 'गणाधीश ईश जो सर्व गुणांचा । मुळारंभ आरंब त्या निर्गुणांचा ।'

श्री गणेशाला  सहस्त्र नावे आहेत ती गुण, कर्म वा विशेषतांच्या आधारे दिलेली आहेत. ही नावे व गणेशाची मूर्ती प्रतिकातमक आहेत. हत्तीचे मस्तक आहे म्हणून गजानन किंवा गजवदन, देवगणांत पूज्य असल्यामुळे श्रीगणेश मोठे उदर आहे म्हणून - लंबोदर, वाकडी सोंडीमुळे वक्रतुंड, विघ्नांचा नाश करणारा आहे म्हणून विघ्नहर्ता किंवा विघ्न-विनाशक अशी एक नव्हे हजार नावे आहेत.

गणेशाची मूर्ती बघितली की मनात प्रश्न उठतात की मानवी शरीर व त्यावर हत्तीचे गंडस्थळ युक्त शिरःकमल का ? खरोखरच अशी देवता या भूतलावर कधी काळी होऊन गेली का ? प्रतिकात्मक मूर्ती म्हणावी तर त्या मागील आध्यात्मिक रहस्य काय ? त्यांचे वाहन उंदीर का ? तर आता आपण त्यामागील रहस्य समजून घेऊ या.

शिर - गंडस्थळ युक्त हे शिर कमल मोठा मेंदू साठविणारे असे चातुर्याचे समजण्यात येते. तथापि मानवात  ही पशु-प्रेम भावनेचे बीज आहे हे दर्शविले. बुद्धीदाता गणेश हा आध्यात्मिक व ऐहिक श्रेष्ठ बुद्धीचा समजला जातो. तो बुद्धीदाता ही आहे म्हणून आपण त्याच्याकडे सद्‌बुद्धीची मागणी करतो.

श्रीगणेशाच्या अंग-प्रत्यंगात अनेक प्रकारचे रहस्य दडलेले आहे ते ओळखणे व आपल्या जीवनात धारण करणे हीच खरी भक्ती, खरी उपासना होय.

डोळे - गजाननाचे डोळे फारच बारीक आहेत पण तितकेच तीक्ष्ण आहे. हत्तीची विशेषता आहे की तो खूप दूरवरचे सहज पाहू शकतो आणि टाचणीसुद्धा उचलून माहुताकडे देऊ शकतो असा हा गजानन दूरदृष्टीचा आहे. तशीच त्याची सुक्ष्मदृष्टी आहे. मानवी जीवनात दूरदुष्टीला फार महत्व आहे. दूरदृष्टी म्हणजेच माणसाजवळ सारासार विचार करण्याची शक्ती असते. जिच्यामुळ तो जे कार्य करतो ते विचारपूर्वक करतो. त्याला सहज सफलता प्राप्त होते. त्याच्यावर पश्चाताची पाळी कधीही येत नाही.

कान - हत्तीचे दुसरे वैशिष्ट्य असे की, तो आपले कान सतत हलवित असतो. त्याचे कारण असे की, मुंगीसारखी सुक्ष्म व व्यर्थ गोष्ट कानात शिकली तरीदेखील महा-अनर्थ घडू शकतो अशा गोष्टी कानात शिरू नये म्हणून काम नेहमी झटकीत असतो अर्थात सदैव सतर्क राहतो. व्यर्थ गोष्टी ऐकण्यापासून स्वतःचा बचाव करण्याचा गुढ संदेश श्री गणेश आपणास देत आहे. याकरिता म्हटले आहे 'बुरा मत सुनो.'

मुकुट - गणपती वा कोणत्याही देवतेला दुहेरी मुकुटधारी दाखवितात. त्याचे कारण देवी-देवता निर्विकारी असतात, पवित्र असतात. पवित्रतेत एक आगळे वेगळे तेज असते. पवित्रतेचे प्रतीक म्हणून देवतांना प्रभावळ दाखवितात. तसे श्रीगणेशाला देखील दाखविले आहे ती पवित्रतेची निशाणी आहे.

सोंड - हत्ताच्या सोंडीमध्ये खूप शक्ती असते. मोठ मोठाली झाडे तो सहज उखडून टाकतो.गजानन जीवनात आलेल्या विघ्नांना मग ते कितीही मोठी असोत त्यांना सहज दूर करतो. सृष्टी चक्रात उजवीकडील भाग (सत्य व त्रेतायुग) स्वर्ग व डावीकडील (व्दापर व कलीयुग) नर्क दाखविला आहे. उजवीकडे वळविलेल्या सोंडेचा गणपती अत्यंत शुभ व जाज्वल्य असतो तो आपणास हा संदेश देत आहे की आता परिवर्तनाचा काळ आलेला आहे. तेव्हा आपले मुख स्वर्गाकडे वळवा व नरकाकडे पाठ फिरवा.

उदर - गणपतीचे उदर सागराप्रमाणे विशाल आहे. सागरात ज्याप्रमाणे सामावण्याची शक्ती असते तसेच अनेक ऐकलेल्या व पाहिलेल्या अप्रिय गोष्टी सामावण्याच्या शक्तीचे प्रतीक त्याचे विशाल उदर होय. लंबोदर नाव त्यामुळेच पडले आहे.

वाहन उंदीर - गणपतीचे वाहन उंदीर आहे. ते निष्कारण खोड्या करणाऱ्या व नाश करणाऱ्याचे मनाचे द्योतक आहे. बौद्धीक व आध्यात्मिक उन्नतीच्या आवश्यक असलेल्या सुविचारांचा व सुदृढ प्रमाणांचा नाश करणारा जो दुष्ट तर्क व त्या तर्कांनी केलेली जी अनुचित हानिकारक समालोचना, तिच्यावर दबाव करून त्या दुष्ट तर्कास पराभूत करणारी ही देवता आहे. उच्च तऱ्हेच्या ज्ञानात पारंगत होण्यात निष्कारण चबढब करणाऱ्या अस्थिर मनावर ताबा मिळविणे अत्यंत आवश्यक आहे अशा मनाचा प्रतिक असलेल्या उंदरास गणपतीचे वाहन दाखविले आहे.

मात-पित्यांची परिक्रमा करून त्यांच्यात ब्रह्मांडाचे दर्शन घडविणाऱ्या गजाननाचे हे बुद्धी चातुर्याचे प्रमाणच होय. श्री गणेशाच्या अंग-प्रत्यंगात अशाच प्रकारचे आध्यात्मिक रहस्य दडलेले आहे. ते ओळखणे व आपल्या जीवनात धारण करणे हीच खरी भक्ती, खरी उपासना होय.गणपतीचे विविध अवयव ज्ञानी माणसाचेच प्रतीक आहे.

आता प्रश्न असा उरतो की, अशा सर्वगुण सम्पन्न देवी-देवतांचा रचियता कोणी तरी असेल ना. गणपती हा शिवपुत्र आहे. शिव हा परमात्मा आहे. तो देवात्मांचा तसेच सर्व आत्म्यांचा पिता आहे. त्यांनीच आत्म्यांना देवत्व पदाची प्राप्ती करून दिलेली. मग प्रश्न असा उरतो की, आज या देवीदेवता कुठे आहेत? त्यावर सत्ययुगात होऊन गेल्यात आणि आज हे आत्मे जन्म मरणाच्या चक्रात अडकलेले आहेत. तरी त्यांच्या प्रतिमेची आज अत्यंत भक्तिभावाने पूजा होत आहे.

सांप्रत काळ हा सृष्टीचक्र पूर्ण होण्याचा आहे. कलीयुग संपून लवकरच सत्ययुग येणार आहे. कारण परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. हा कलीयुग व सत्ययुगाचा संगम समय चालू आहे. कलीयुगाचा अंत व सतयुगाचा आदि काळास ‘पुरूषोत्त्म संगमयुग’ म्हणतात. याच काळात परमात्म्याच दिव्य अवतरण झालेले आहे. ते परकाया प्रवेश करून स्वतःचा व त्यांचे माध्यम प्रजापिता ब्रह्माचा परिचय स्वतः आम्हास देत आहे. त्यांनी हा रूद्र ज्ञान यज्ञ रचला आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाव्दारा परमपिता परमात्मा शिव ‘नराचा श्रीनारायण व नारीची श्रीलक्ष्मी बनविण्याचे आपले दिव्य कर्तव्य करीत आहे. त्यांच्या या दिव्य कार्यात सहयोगी बनून मदत करतात ते ब्रह्माकुमार, ब्रह्माकुमारी म्हणून ओळखले जातात. या यज्ञाचा संपूर्ण कारोबार माता-बहिणींच्या मार्फतच चालतो. आपणही या यज्ञात सहभागी होऊन देवपद प्राप्त करू शकतो पण वेळ थोडा राहिलेला आहे. ‘अभी नहीं तो कभी नहीं.’

# गणपती-ज्ञानी और योगी पुरूष का प्रतीक

हर साल भारत वर्ष में गणपति उत्सव काफी धुमधाम से मनाया जाता है. दीपावली के बाद, यही उत्सव ज्यादा दिनों तक चलनेवाला है। आम जिंदगी में भी गणपति का महत्व है, इसीलिए तो काफी बडी संख्या में लोग गणपति की पूजा, अर्चना व साधना करते हुये पाये जाते है. सभी मुहूर्त शुभ अवसरों की शुरूवात भी गणपति की स्तुति से ही करते है. व्यापारी क्षेत्र से जुडे हुए लोग भी अपने बैठने के स्थान के नजदीक, 'स्वस्तिक' जो गणपति का सुचक है, निकालते है तथा उसे शुभ, लाभदायी मानते है. गणपति का महत्व तो यहाँ तक है कि शिवभक्त लोग भी, पहले गणेश का नाम लेते है, सबसे पहले गणराया को वंदनीय मानते है. इतनी महीमा गणपति की है, लेकिन गणपति किसका प्रतीक है ? गणेश की पूजा क्यो करनी चाहिए ? गणेश अत्सव से आज हमें कौनसी प्रेरणा लेना आवश्यक है ? गणेश के विचित्र आकार में अर्थात, गजवदन, वक्रतुंड, हाथी की आँखे, बडा पेट, हाथ में रस्सी, या मोदक आदी-आदी में कौनसे रहस्य भरे हुए है ? गणपति की बैठक भी विशिष्ट प्रकार की होती है, वो हमें क्या प्रेरणा देता है ? स्वस्तिक गणपति का समान अर्थक कैसे है ? यह सब बातों का, अलकारों का राज जानना आवश्यक है। क्योंकि, जब कोई चित्रकार या मूर्तिकार चित्र या मूर्ती बनाते ह, तो वे कई आध्यात्मिक तथा लोगों के जिन्दगी से जुडे रहस्यों को समाविष्ट करने के लिये ही बनाते है तथा उनको अलग-अलग अलंकार देते है.

निरपेक्ष भाव और धार्मिक ग्रंथों में पाई जाने वाली दंत कथाओं को बाजू में रखकर, तर्कसहीत सोचा जाये तो हमारे सामने यही सत्य उभर आयेगा की, वास्तव में गणपति किसी ज्ञानवान तथा योगयुक्त व्यक्ती का प्रतीक है, और ऐसे व्यक्ती के कर्तव्यों के यादगार रूप में ही गणेश उत्सव मनाया जाता है. अब हम देखेंगे की गणेशजी के मूर्ती में कौनसे रहस्य भरे हुये है.

गणेश की मूर्ती या चित्र देखने के बाद एक बात हमारे समझ में स्पष्ट रूप से आती है, वो ये की, गणेश के सिर को छोडकर उनका सारा आकार मनुष्य जैसा ही है. सिर्फ गणेशजी को, हाथी का सिर, सुंड, गजकर्ण, हाथी की आँखें, दात आदी दिखाये जाते है. भला यह क्यों ? अब

सिर - हाथी का सर ही लिजीये, हाथी को बुद्धीवान समझा जाता है. हाथी का सिर काफी बडा भी होता है, उसकी स्मृती भी तेज होती है. जिसे परमात्मा, आत्मा, प्रकृती तथा सृष्टी का सम्पूर्ण ज्ञान प्राप्त है, जो परमात्मा के प्रति निश्चय रखता है, ऐसे व्यक्ति को संस्कृत में विशाल बुद्धी कहा जाता है. अब ऐसे मनुष्य के सिर को हाथी के सिर से चिंत्रित करना योग्य तो है. तभी तो आम व्यवहार में भी विशाल बुद्धी वाले व्यक्ति के लिये कहते है, 'कमाल है इसकी, यह तो हाथी के दिमाग वाला है.' इसी तरह हाथी निर्भयता, आत्मविश्वास, सफलता, कर्तव्य के प्रति निष्ठा, छोटी-छोटी बातों को ध्यान न देना आदी -आदी का प्रतीक है. इसलिये एक कहावत भी है की 'कुत्ते भुंकते है, हाथी चलता है.' और यह कहावत बी ऐसे व्यक्ती के लिये कही जाती है जिसमें, उपरोक्त गुण है. इसी तरह से जैसे हाथी अपनी

सुंड - सुंड हे कठीण से कठीण काम सहजता से कर सकता है क्योंकि उसकी सुंड मजबूत और शक्तिशाली होती है, साथ ही हाथी उसी सुंड से किसी को पुष्प अर्पित कर सकता है अथवा छोटे-छोटे बच्चों को भी प्रणाम कर सकता है. इसी प्रकार ज्ञानी व्यक्ति में भी एक प्रकार से आध्यात्मिक शक्ती होती है, जिससे वो आनेवाली परिस्थितियों का सामना सहज करता है. लेकिन ज्ञान की इस शक्ती का गर्व न रखते हुए वो छोटो को भी आदर सम्मान आदी देता है.

कान - ऐसे ही बडे कान किसी महत्पूर्ण बात को, ध्यान से, जिज्ञासापूर्वक ग्रहण श्रवण करने के प्रतीक है.

आँखे - आँखे छोटों में भी ब्डाई देखने के प्रतीक है. महानता, विशेषता देखने के प्रतीक है.

दात - जैसे कुछ दात दिखाने के होते है, वैसे हीहाथी का एक दात जो गणेशजी को दिखाते है वो भी एक प्रकार की मन समझ, दूरदर्शिता, चतुराई, अर्थात निती-निपुणता का प्रतीक है. यह भी एक कुशल व्यक्तीत्व का मुल्यवान गुण है.

महोदर - महोदर अर्थात गणपति का बडा पेट छोटी-मोठी, अच्छी बुरी बातों को एवं हाख अपने में समा लेने का प्रतीक है. आसुरी संस्कारों को मार-मिटाने के लिये ज्ञानरूपी कुन्हाडा एक हाथ में है तथा दुसरे हाथ में ईश्वरीय नियमों तथा परमात्मा के प्यार में स्वयं को बांधने का प्रतीक, रस्सी दिखाई जाती.

मोदक/लड्डू - इसी प्रकार जब को व्यक्ती अपने मनोरथ को पूर्ण करता है, कार्य में सफलता पाता है, तो वो खुशी से फुले नही समाता और आनंद विभोर होकर सभी को लड्डू बाँटता है । मोदक जो, लड्डू काही प्रतीक है, जिसे गणेशजी के हाथ में दिखाते है, वह भी व्यक्ति के सफलता का प्रतीक है, जैसे की सफलता उससे उत्पन्न होनेवाली खुशी उसके हाथ में है ।

और जब उपरोक्त बतलाये हुए सारे लक्षण व्यक्ति अपने अंदर धारण कर लेता है तब वह विशाल बुद्धीवाला, शक्तिशाली, दुसरों को शान्ति और शक्ति का वरदान देने योग्य बन ही जाता है, विघ्न विनाशक बन जाता है । इसलिए गणेश के एक हाथ को वरदानी हाथ के रूप में दिखाते है. इसी तरह से गणेशजी का व्यक्तित्व कई आध्यात्मिक रहस्यों से भरा हुआ है.

अब इन रहस्यों को आज की परीवेश में देखा, समझा जाए तो ये बात समझ में आती है, की अब मनुष्य को गणपति जैसा बनना आवश्क है. तभी उसका जीवन सुखी-समाधानी हो सकता है. वह सदैव आनंदी, सफलता का मालिका बन सकता है अर्थात गणपति के बारे में उपर स्पष्ट किये हुए सभी लक्षण आज हमें स्वयं में धारण करने की आवश्यकता है. वास्तव में हर साल मनाया जानेवाला गणेश उत्सव हमें इसी बात की प्रेरणा देता है. जब हम सभी यह बातें अपने में धारण करेंगे तभी सच्चे अर्थो में हमारे सभी विघ्न दूर हो जायेंगे. या यू कहे की, विघ्न आयेंगी ही नहीं. यही है विघ्न विनाशक की स्थिती।

अब इन सभी बातों को अपने में धारण करने के लिये आवश्यकता होती है आन्तरीक शक्ति की, जो हमे ज्ञानसागर परमपिता परमात्मा से प्राप्त हो रहे ज्ञान के आधार हे तथा परमात्मा व्दारा सिखाये जानेवाले सहज राजयोग से प्राप्त होती है. क्योंकि संपूर्ण सत्य आध्यात्मिक ज्ञान को ही शक्ती, प्रकाश आदी कहा जाता है. इस सत्य आध्यात्मीक ज्ञान को जानने से ही हम सच्चे अर्थ में गणेश उत्सव मनायेंगे, या हमारे विघ्न दूर हो जायेंगे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स
www.bkvarta.com